



म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय — ली-ली
दा. क्र. ४०७४

BVBK-0400474

# भलतुकडी गीते



लेखक :

श्री. कल्याण इनामदार

BVBK-0400474

ग्रंथालय शाखा.

दा. क्र.

विषय

ज्योत्स्ना प्रकाशन

मूल्य ऐंशी पैसे

# बाळ



बाळाला हवाय
रंगीत पाट
चांदीची वाटी
चांदीचे ताट
दिला तर बरं
इवलासा गडू
नाही तर येई
पटकन् रडू

लुच्याला कसं
गोड गोड हवय

आईचा पापा
त्याची ही सवय

असा हा बाळ
सांगायचं काय !

घरभर खोड्या
तुरुतुरु पाय





## फुगा

फुगा घ्या फुगा
गोल आणि उभा
फटकन् फुटताच
आभाळात बघा

फुगा घ्या फुगा
रडू नका उगा


फेरीवाला चालला
डमू डमू डिगा

फुगा घ्या फुगा
आई आणि बाबा
बेबीची पापी
पटकन् मागा

## लाडोबा

आई देते पापा बाबा देती रप्पा
दादा असतो टाईट, ताई करते ऐट
आम्ही म्हणे लहान, धरू द्यावा कान
कोणी म्हणे लुच्चा, धरून गालगुच्चा
मोठे म्हणतात छोटे, आमच्यात नका येऊ
छोटे म्हणतात मोठे, मिळणार नाही खाऊ
खरे खोटे अजून कळत नाही काही
अकलेचा लाडोबा घरात बसून राही

# माऊची शाळा



मनी माऊने काढली शाळा
चिमण्या-कावळे झाली गोळा
पोपट, पारवे, ससोबा, खार
शिकायला सारी झाली तयार
माऊ म्हणाली—
'पहिल्या दिवशी शिकायचं काय?'

ओरडले सारे—
'चोरून खायची कशी
दूध आणि साय'
माऊ म्हणाली-
'पळा पळा
चालते व्हा घरी
शाळेपेक्षा खरं
तर सुट्टीच बरी'



# पावसाचे गाणे



कडाडकड....का गडबड ?
पावसा पावसा पटकन् पड !
चटकन् सारे बदल बरे
भिजवून जा ना फूलं तुरे.
लखकन् का ही वीज अशी
तुझ्या खेळते अंगाशी ?
वाऱ्याचा फोडीत फुगा
कारे मस्ती उगा उगा ?
सरकन् येवू देत सरी
भरकन् आम्ही पळू घरी

## मधाची मिठी

मधाची मिठी
खरी नि खोटी
पटकन् पापा
आईसाठी
शाळेला दांडी
आईस्क्रिम कांडी
जमाडी जम्मत
साखर तोंडी
बाबाचा धाक
घर चूपचाच
शुभं-करोती
आप्पोआप
नंतर काही
बोलायचं नाही
झोपायला कुशीत
घेतेय् आई


# लिंबु टिंबु सर्कसवाले




लिंबु टिंबु सर्कसवाले
हत्तीच्या तोंडातून आले
उंटाच्या मानेत शिरले हळू
उंचून पाहिले टुळुटुळु
वाघाच्या घशात मारली उडी
तिथून गायिली बाराखडी
सशाच्या पोटात टाकले पाय
पळता पळता हुश हाय हाय !
झोक्याचे मग धरले हात
भुईवर आले गिरकी खात

## बगाराम भोळे

बगाराम भोळे बोलती खूप
बोलून बोलून बसती चूप
बगाराम भोळे मारती भाव
ऐकत बसतो सगळा गाव
बगाराम भोळे ऐटीत गाती
गाता गाताच झोपून जाती
बगाराम भोळे आळशी फार
लोळून खाती बिस्कीटं चार
बगाराम भोळे भलतेच ताठ
गालात गोबरे बुटका माठ



## चंदामामा




पौर्णिमेच्या चांदण्यात
चंदामामा कसा
छान छान दिसे किती
गोरापान जसा

तुरुतुरु हरणाची
इवलिसी गाडी
भोवताली चांदण्याची
लखलख होडी

कुरेंबाज चाल कशी
मंद मंद वाहे

डोळे नसे तरी कसा
लुकुलुकु पाहे
मऊ मऊ अंगाभोवती
काळे निळे ढग
पिंजारल्या कापसाचा
वाटे जणू रग
रातभर जागरण
कधी घेता झोप
चंदामामा पहाटेला
कुठे जाते रुप ?






## चिऊताई चिऊ

चिऊताई चिऊताई तुझी ग बाई
सदान् कदा, भलतीच घाई
चिवचिव करून उठायचं रोज
आभाळात उडून, करायची मौज
टिपायचे दाणे उन्हातान्हातं
चटकन् खायचा, बाळाचा भात
कधी नाही रुसू ओठावर हसू
चिमण चारा, असू नसू
अशा हो कशा चिऊताई तुम्ही
पट् पट् काम, आळस कमी



## ढगोबा

पावसात ढगोबा
काळे काळे ढुस
सारखे रडतात
उगी मुसमुस
हिवाळ्यात ढगोबा
हालवीत मान
कुडकुड थंडीत
हसतात छान
उन्हाळ्यात ढगोबा
तापतात मोप
मिचमिच डोळे
झुळझुळ झोप



## आइस्क्रिमची कांडी


आइस्क्रिमची कांडी
लाल लाल लाल
गार गार करते
गोबरेसे गाल
आइस्क्रिमची कांडी
गोड गोड असे
बेबी न् बाळू
खुदकन् हसे
आइस्क्रिमची कांडी
भलतीच धीट

दोन-तीन बोटांत
उभी राही नीट
आईस्क्रीमच्या कांडीची
मज्जाच मजा
खाईल तो होईल
साखरेचा राजा

★

## वाऱ्याचा झगा

वाऱ्याचा झगा .... बघा बघा
कित्ती फुगतोय.... उगा उगा
झटकन जाई .... वरी वरी
फुग्याच्या बाह्या.... किती तरी
आभाळातच .... फुगा फुटे
पटकन् त्याचा .... तोल सुटे
गरकन् गिरकी .... घेत खाली
चोरुन पाहे .... भवताली
हिरमुसलेले .... तोंड दिसे
डोळे चोळीत .... झगा बसे




## एकेकाची गंमत


चिव चिव चिव
चिमणचारा आणते
बसू कशी उगाच
चिमणीबाई म्हणते

काव काव काव
कोण करतो राव ?
हा तर काळा कावळा
याचा हाच स्वभाव

कुहू कुहू कुहू
आवाज हिचा भारी
लहर लागेल तेव्हा गाते
कोकीळेची स्वारी

बोलतो बोलतो म्हणता
बोलेल तसा गोड
मिठ्ठूला या हवी पण
एक पेरूची फोड






म्यांव म्यांव म्यांव
मनी दिसते साव
सदानूकदा हिला पण
चोरून खायची हाव
भो-भो....भुंकतो
वरती करुन मान
घरापुढच्या मोत्याचे
टवकारलेले कान
डराव डराव करून
खूप मारता उड्या
बेडूकदादा तुमच्या
पाण्यामधेच खोड्या

एप्रिल-मे
ऊनच ऊन
घ्यावे पिऊन
गारीगार

एप्रिल-मे
शाळा नाही
जिकडे तिकडे
लगिन् सराई

एप्रिल-मे
घामाच्या धारा
खुशाल झोपतो
खट्याळ वारा

एप्रिल-मे
कामच काय?
आंबे खाऊन
हुश! हाय-हाय!



## फुग्गेराव

फुगताय काय भराभर राव
फटकन् फुट्टाल फुग्गेराव !
रुसलेत किती गोबरेसे गाल
जांभळे पिवळे हिरवे नि लाल
कुठायत डोळे कुठ्ठय नाक ?
तोंडाला दोऱ्याचा बसलाय धाक
ऐट पण....तरी आभाळाला हात
सांभाळा फुग्गोबा त्यातच घात
काय हो झालं फटकन् असं ?
जिरली ते आम्हाला सांगाल कसं ?



विषय
BVBK-0400474